MHGA040005002025

दाखल तारीख : १४.०८.२०२५
नोंदणी तारीख : १४.०८.२०२५
निकाल तारीख : २७.०७.२०२६
कालावधी : ००वर्ष. ११म. १३दि.

**नि.क्र.९** वर

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :२७/०७/२०२६)**<br>**सं.फौ.मा.क्र.३१७/२०२५** |
| | गुन्हा क्र. :१३/२०२५<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी |
| **अधिवक्ता** | सहा. सरकारी वकील श्री. उईके |
| **आरोपी** | पवनसिंग गोविंदसिंग जुनी,<br>वय २५ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>राह. अरसोडा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | आरोपीचे विधिज्ञ श्रीमती पठान |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | १४.०१.२०२५ |
| प्रथम खबरेची तारीख | १४.०१.२०२५ |
| आरोपपत्राची तारीख | १४.०८.२०२५ |
| अपराधाचा तपशिल तयार करण्याची तारीख | १४.०८.२०२५ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | २३.१२.२०२५ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | २७.०७.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

## आरोपीचा तपशिल

| क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४६८ भा.ना.सु. सं.च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मणसिंग गोविंदसिंग जुणी | कलम ३५(३) भा.ना.सु. सं. सुचनापत्र दिले. | ६५(फ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | काही नाही |

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

### अ. <u>अभियोग पक्ष</u> :-

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | नाजुक देविदास चाटारे | ९ वर | पंच |

### ब. <u>आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर</u> :-

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

### क. <u>न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर</u> :-

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

### अ. <u>फिर्यादी</u> :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

### ब. <u>बचाव</u> :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

### क. <u>न्यायालय</u> :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.२ | सि.ए. अहवाल |

### ड. <u>भौतीक वस्तु</u> :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**<u>न्या य नि र्ण य</u>**
**(<u>दिनांक २७ जुलै, २०२६ रोजी घोषित</u>)**

आरोपी हा मौजा अरसोडा येथील शेतशिवारात नाल्या जवळील झाडा खाली १० नग प्लास्टीकच्या चुंगळ्या मध्ये प्रती चुंगळी ३० किलो प्रमाणे एकुण ३०० किलो मोहासडवा अवैध्यरित्या विनापास परवाना विक्रीकामी मिळुन आल्याने आरोपीवर कलम ६५(फ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करुन खटला चालविण्यात आला. त्यानंतर अभियोग पक्षाने पंच साक्षीदार तपासला. खालील मुद्दे माझे समोर उपस्थीत झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले आहे कायं की, दि.१४.०१.२०२५ रोजी १५.१० ते १६.१० वाजताचे दरम्यान मौजा अरसोडा, ता. आरमोरी येथील शेतशिवारात नाल्या जवळील झाडा खाली १० नग प्लास्टीकच्या चुंगळ्या मध्ये प्रती चुंगळी ३० किलो प्रमाणे एकुण ३०० किलो मोहासडवा अवैद्यरित्या विनापास परवाना मोहादारु विक्रीकामी तयार करतांना मिळुन आली, त्याद्वारे आरोपीने कलम ६५(फ) अन्वये गुन्हा केला ? | … नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात येते. |

**<u>कारणे-मिमांसा</u>**
**<u>मुद्दा क्र.१ व २</u>** :-

२. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(फ) अंतर्गत गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाने पंच नाजुक चाटारे (सा.क्र.१) याला तपासले आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, दि.१४.०१.२०२५ रोजी पोलीसांनी त्याला पंच म्हणुन कुठेही बोलाविले नव्हते. पोलीसांनी त्याच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. परंतु पंचनामे त्याला दाखविण्यात आल्यावर त्याने त्यावरील असलेली सही त्याची असल्याचे कबुल केले. परंतु त्यातील मजकुर नाकारला. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत न केल्याने प्रकरणातील पंचनामे हे कायद्याप्रमाणे सिद्ध झालेले नाहीत. सहा. सरकारी वकीलांनी उलटतपास घेतला असता त्यात नकाराशिवाय काहीही आले नाही. आरोपीच्या वकीलांनी उलटतपास नाकारला.

३. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपी हा वारंवार गैरहजर राहत असल्याने त्याचे विरुध्द वारंट काढण्यात आले. परंतु अभियोग पक्ष आरोपीला हजर करण्यास अपयशी ठरले. अभियोग पक्षाने फक्त पंच साक्षीदाराला तपासलेला आहे. परंतु पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. पोलीसांनी त्याच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नसल्याचे त्याने सांगितले आहे. तसेच अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवून देखिल इतर साक्षीदारांना हजर करु शकलेले नाही. फिर्यादी व तपासी अंमलदार यांना वारंवार समन्स काढून देखिल ते साक्ष देण्याकरीता न्यायालया समक्ष हजर झाले नाहीत. अभियोग पक्षाने सि.ए. अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे परंतु नमुना वाहकाला न तपासल्याने आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेले द्रव्य ही दारुच होती ही बाब सप्रमाण सिध्द होऊ शकलेली नाही. करीता जप्त दारुशी आरोपीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध होता असे कुठेही दिसून येत नाही. सदर दारु आरोपीच्या ताब्यातुन जप्त केली व सदर दारुवर आरोपीचा ताबा होता हे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे आरोपीने गुन्हा केला हे सिद्ध होत नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर ‘नकारार्थी’ देत आहे व मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **पवनसिंग गोविंदसिंग जुनी** याची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(फ) च्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त ३०० किलो मोहासडवा घटनास्थळी नाश केल्याने त्याबाबत कोणताही आदेश पारित नाही.

३. आरोपीने दिलेली जमानत अपिल कालवधी पर्यंत अस्तित्वात राहिल.

(आदेश खुल्या न्यायालयात तोंडी सांगण्यात आला व उद्घोषित करण्यात आला.)

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.07.27 17:08:03 +0530

दि.२७.०७.२०२६

(श्रीमती व्ही.व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी.